लातूर **भूकंप**

LATUR BHUKAMP

संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : गुरुवार – २० जुलै २०२३

वर्ष – ३७ वे

अंक – ११३

पाने – ४

E-Mail : dailybhukamp@gmail.com

RNI No. MAHMAR/2012/42770

☎ : -9422072823,251822

epaper.dainikbhukamp.com

किंमत २ रूपये




लातूर - तिरुपती

श्री. बालाजी दर्शनासहित

A/C SLEEPER I AIR SUSPENSION

जुलै महिन्याचे वेळापत्रक

जुलै महिन्याच्या तारखा

◂ दर मंगळवारी ▸

4 11 18 25

दुपारी २.०० वा.

अधिक माहितीसाठी संपर्क

88888 50441
88888 45404

विश्व ट्रॅव्हल्स लातूर.


## त्यांच्या मते....

▣ **माळीणची पुनरावृत्ती, इर्शाळवाडी गावावर दरड कोसळली.**

– एक बातमी

माळीण, तळिये दुर्घटनेनंतर आपण काही शिकलो नाही हेच इर्शाळवाडी दुर्घटनेने दाखवून दिले आहे.

▣ **मणिपूरमध्ये दोन महिलांची विवस्त्र धिंड, सामुहिक अत्याचार केला प्रकरणात जर सरकारने निर्णय घेतला नाही तर आम्ही घेऊ.**

– सर्वोच्च न्यायालय

अशात आपल्या देशात सरकार करित नाही म्हणून अनेकवेळा न्यायालयालाच कारवाई करावी लागत आहे.

▣ **पावसाळी अधिवेशन चालू झाल्या दिवसापासून सत्ताधारी व विरोधक यांच्यात जोरदार शाब्दीक युद्ध.**

– एक बातमी

विधीमंडळाचे स्वरूप रणभूमी असेच बनत आहे.

▣ **मन की बात करण्याऐवजी मणीपूर की बात करा.**

–काँग्रेस अध्यक्ष खर्गे

हि खरी जन की बात.

# इर्शाळगड वाडीवर दरड कोसळली

## ७ जणांचा मृत्यू



खालापूर : खालापूर तालुक्यातील इर्शाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या वाडीवर दरड कोसळली आहे. तर मोरबे धरणाच्या बाजूला असलेल्या वस्तीवर दरड कोसळली असून या ठिकाणी ५० ते ६० घरांची वस्ती होती. इर्शाळगड डोंगरावरील काही भाग कोसळल्याने ही दुर्घटना घडली असून यामध्ये ७ जणांचा मृत्यू झाला आहे. मुसळधार पाऊस पडत असताना ही घटना घडली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दादा भुसे हे घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी तेथील परिस्थितीचा आढावा घेतला आहे. अजितदादा मंत्रालयातील आपत्कालीन कक्षात दाखल झाले आहेत.

दोन हेलिकॉप्टर हे रेक्स्यू ऑपरेशनसाठी तयार आहेत. तसेच ज्या-ज्या माध्यमातून बचाव कार्य करता येईल त्याची मदत घेतली जाईल. युद्धपातळीवर बचाव कार्य सुरु असल्याची माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. तसेच केंद्रीय मंत्री अमित शहांनी सुद्धा दुर्घटनेप्रकरणी विचारपूस केली असून आवश्यक ती मदत केंद्र सरकारकडून दिली जाईल असे ही एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे.

घटनास्थळी बचावासाठी अग्निशमन दल, एनडीआरएफ घटनास्थळी दाखल होत आहेत. पावसामुळे माती निसरडी झाल्याने वाडीपर्यंत पोहोचण्यास मदत पथकाला बचावकार्यात अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.पावसामुळे अजूनही डोंगरावरची माती घसरतेय. गावापर्यंत पोहोचण्याचा रस्ता बंद असून वाहने जात नाहीत. अर्धा तास पायी चालत जावे लागत आहे. या घटनास्थळी जात असतानाच एका अग्निशमन दलाच्या जवानाचा दम लागून मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे.

दरड कोसळून आता पर्यंत ८० जणांना वाचवण्यात यश आलेले आहे. तर एनडीआरतर्फे बचावकार्य युद्धपातळीवर सुरु करण्यात आले आहे. १०० पेक्षा अधिक लोक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. बेपत्ता लोकांमध्ये ५-७ मुलांचा सुद्धा समावेश आहे. घटनास्थळी मदतीसाठी दोन हेलिकॉप्टर तयार आहे. मात्र वातावरणाच्या स्थितीमुळे ते स्टँडबायवर आहे. त्याचसोबत दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांचा खर्च आणि जखमींचा सर्व खर्च सरकारतर्फे कडून करण्यात येईल असे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुर्घटनास्थळी भेट देऊन बचावकार्याची पाहणी केली

# मृतांच्या वारसांना ५ लाखांची मदत, जखमींवर शासकीय खर्चाने उपचार

मुंबई : रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे खालापूरनजीक इर्शाळवाडी परिसरात गावावर दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने स्थानिक नागरिकांच्या मदतीने तात्काळ बचाव व मदतकार्य सुरु केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दुर्घटनास्थळी भेट देऊन बचावकार्याची पाहणी केली, तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळीच मंत्रालयात जावून आपत्कालिन नियंत्रण कक्षाची सूत्रे हातात घेत, बचाव व मदतकार्याला सुरुवात केली आहे. इर्शाळवाडी दरड दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना पाच लाख रुपये मदत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केली आहे. त्यासोबतच या दर्घटनेत जखमी झालेल्यांवर सरकारी खर्चाने उपचार केले जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार नियंत्रण कक्षातून दुर्घटनास्थळावर उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांना बचाव, मदतकार्यासाठी हेलिकॉप्टरसह आदी यंत्रणा तात्काळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही पूर्ण केली. दुर्घटनास्थळी उपस्थित मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून त्यांनाही नियंत्रण कक्षास प्राप्त झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीची माहिती उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

# बनावट कागदपत्राद्वारे दस्त नोंदणी लातुरात दोन गुन्हे दाखल

लातूर : बनावट कागदपत्रं तयार करून त्याच्या आधारे नोंदणी अधिकारी यांच्याकडे दस्ताची नोंद करून नोंदणी अधिकारी व शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी लातूरच्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

अनिल राजाराम बेळंबे रा. विद्यानगर जालना रोड औरंगाबाद यांनी लातूर येथील सर्वे नं. २५८/१ मधील गुंठेवारी नियमाधीन प्रमाणपत्र हे बनावट स्वरूपात तयार करून ते खरे आहे असे म्हणून दस्त नोंदणी करून दुय्यम निबंधक वर्ग-२ लातूर कार्यालय क्र. १ यांची फसवणूक केल्या प्रकरणी गोविंद मजकटे प्रभारी दुय्यम निबंधक यांच्या फिर्यादीवरून फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हा प्रकार १२ ऑगस्ट २००८ रोजी झाल्याचे नमुद करण्यात आले आहे.

गोविंद मजकटे यांच्याच फिर्यादीवरून मोहम्मद हनीफ मानसुरी रा. मुन्नाबाई चाळ गावदेवी अंधेरी वेस्ट मुंबई याने महाराणा प्रतापनगर ग्रामपंचायत येथील नमुना ८ प्रमाणपत्र बनावट स्वरूपात बनवून ते खरे आहे असे भासवून दस्ताची नोंद करून नोंदणी अधिकारी क्रमांक १ लातूर यांची व शासनाची फसवणूक केल्या प्रकरणी त्याच्या विरोधातही फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मानसुरी याने हा प्रकार १० ऑगस्ट २०२२ रोजी केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या दोन्ही प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक निळकंठे हे अधिक तपास करीत आहेत.

## सुपारी खाऊ घालत नाही म्हणून कोयत्याने जबर मारहाण

लातूर : सुपारी का खाऊ घालत नाही म्हणून चौघा जणांनी एका तरूणास कत्तीने मारून जबर जखमी केल्या प्रकरणी चौघांच्या विरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लक्ष्मण राजाभाऊ अहिरे रा. कुलस्वामीनीनगर यास बबलु उमाकांत वाघमारे, रोहीत उमाकांत वाघमारे, शुभम व विकास सर्व रा. अवंतीनगर लातूर यांनी कत्तीने मारहाण करून जखमी केल्या प्रकरणी एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## कारची काच फोडून रोख रक्कम लंपास

कासारसिरशी : ममदापूर मोड येथे एक व्यापारी एका हॉटेलसमोर कार लावून चहा पित असताना विनानंबरमधून आलेल्या स्कॉर्पिओ गाडीतील तरूणांनी कारची काच फोडून कारमधील ५० हजार रूपये रोख लंपास केल्याची तक्रार कासारसिरशी पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शेख महेबूब अहमद रा. पेठ मोहल्ला परळी हे व्यापारी आहेत. ते या भागात व्यापाराच्या निमित्ताने आले असता ममदापूर मोडवर एका हॉटेलच्या शेजारी आपली कार उभी करून हॉटेलमध्ये चहा पिण्यासाठी गेले. पाठीमागून आलेल्या व विना नंबरच्या स्कॉर्पिओ कारमधील अज्ञात चोरट्यांनी हॉटेलच्या शेजारी उभारलेल्या त्या कारच्या दोन्ही काचा फोडून कारमध्ये असलेल्या ५०० रूपयांच्या १०० नोटा चोरून नेल्या आहेत. या प्रकरणी कासारसिरशी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# इर्शाळवाडीतील दुर्घटना वेदनादायी-देवेंद्र फडणवीस




मुंबई : रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात इर्शाळवाडी परिसरातील गावात मोठी दुर्घटना घडली आहे. अतिवृष्टीमुळे या ठिकाणी भूस्खलन झाल्यामुळे ६ जणांचा मृत्यू झाला आहे. तर आतापर्यंत ९८ जणांना वाचवण्यात यश आले आहे. याबाबतची अधिक माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

ही वस्ती इर्शाळगडाच्या पायथ्याशी वसली आहे. त्याठिकाणी जाण्याचा रस्ता देखील अवघड आहे. याठिकाणी जवळपास ४८ घरं आहेत. २२८ लोक या गावात राहतात. गेल्या तीन दिवसांमध्ये ४९९ मिमी इतक्या पावसाची नोंद झाली आहे. रात्री १०.३० ते ११ वाजेच्या दरम्यान ही घटना घडली असून आत्तापर्यंत ९८ जणांना वाचवण्यात यश आले आहे.

सदर वाडी ही उंच दुर्गम अशा डोंगरावरती इर्शाळगडाच्या डोंगर कपारीत वसलेली वाडी आहे. सदर ठिकाणी गाडी जाण्यास रस्ता उपलब्ध नसून मौजे याठिकाणाहून पायी चालत जावे लागते. मंत्री गिरीश महाजन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रात्रीपासून घटनास्थळी आहेत. या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे बचावकार्यामध्ये अडथळे येत आहेत. जेसीबी जात नसल्यामुळे दोन ते अडीच टन वजनाचा जेसीबी एअरलिफ्ट करता येईल का असा विचार प्रशासन करत आहे. तर मुख्यमंत्री स्वत: घटनास्थळी असून ते वेगवेगळ्या एजन्सीच्या संपर्कात आहेत. त्याचबरोबर दादा भुसे, उदय सामंत, स्थानिक आमदार तिथे उपस्थित असून ते नातेवाईकांना आधार देत आहेत, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

२२८ पैकी ७० नागरिक हे सुरक्षित असल्याचे सांगितले जात आहे. २१ जखमी असून त्यातील १७ लोकांना तात्पुरता बेस कॅम्पमध्ये उपचार केले असून ६ लोकांना पनवेल येथील MGM हॉस्पिटलमध्ये उपचार दिले जात आहेत. सकाळी १०.१५ वाजताच्या अहवालानुसार १० जणांचा मृत्यू झाला आहे. उर्वरित लोकांचं शोध व बचावकार्य सुरू आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार नियंत्रण कक्षातून दुर्घटनास्थळावर उपस्थित अधिकाऱ्यांशी संवाद साधून त्यांना बचाव, मदतकार्यासाठी हेलिकॉप्टरसह आदी यंत्रणा तात्काळ उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही पूर्ण केली. दुर्घटनास्थळी उपस्थित मुख्यमंत्र्यांशी संवाद साधून त्यांनाही नियंत्रण कक्षास प्राप्त झालेल्या अतिवृष्टी व पूरस्थितीची माहिती उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

# राऊतांचे निकटवर्तीय पाटकर यांना ईडीकडून अटक

मुंबई : मुंबईतील कोविड घोटाळा प्रकरणी ईडीने मोठी कारवाई केली आहे. खासदार संजय राऊत यांचे निकटवर्तीय सुजीत पाटकर यांना अटक केली आहे. कोविड काळात मुंबई महानगरपालिकेने मोठे कोविड सेंटर उभारण्यात आले होते, यावेळी अनेक लोकांना पात्रता नसताना कामे देण्यात आली होती, नियम डावलून त्यांना कामे देण्यात आली असल्याचा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता.

गेल्या काही दिवसापूर्वी किरीट सोमय्या यांनी आक्षेप घेतला होता. जेवढे कॉन्ट्रक्ट या कंपन्यांना देण्यात आली आहेत. या कंपन्या काही दिवसापूर्वी सुरू केल्या आहेत. त्या कंपन्यांना अनुभव नाही, यात अनेक नियम डावलले आहे. ज्या डॉक्टरांच्या नावे बिलं काढण्यात आली ते डॉक्टरही त्या ठिकाणी उपलब्ध नव्हते असा आरोपही सोमय्या यांनी केला आहे, या प्रकरणी आता ईडीने कारवाई केला आहे.

जम्बो कोविड हॉस्पीटल सुरू करण्यासाठी काही खासगी कंपन्यांना कंत्राट दिले होते. या कंपनीने जे डॉक्टर आणि संबधीत यंणत्रा दाखवली ती यंत्रणाच अस्तित्वात नव्हती असा आरोप करण्यात आला आहे.

या कारवाईत सुजीत पाटकर हे लाईफ लाईन मॅनेजमेंटचे डिरेक्टर होते तर दुसरे डॉ. किशोर बिचुले बीकेसी जम्बो कोविड सेंटरचे इंचार्ज होते यांना ईडीने अटक केली आहे. या अटकेने खासदार संजय राऊत यांना आता मोठा धक्का मानला जात आहे. या प्रकरणी आता आणखी काही अधिकारी ईडीच्या रडारवर असल्याची माहिती समोर आली आहे.

# मणिपुरातील अत्याचार प्रकरणी तातडीने कारवाई करा, अन्यथा आम्ही करू-सरन्यायाधीश

मणिपूर : मणिपूर मध्ये दोन महिलांना विवस्त्र करुन त्यांची धिंड काढल्याप्रकरणी सुप्रीम कोर्टाने सुद्धा यावर संताप व्यक्त केला आहे. सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांनी यावर प्रतिक्रिया देत असे म्हटले, मणिपुर मध्ये महिलांसोबत जे काही झाले ते पूर्णपणे वाईट आहे. सरकारने यावर तातडीने कारवाई करावी. जर सरकारने यावर कारवाई केली नाही तर आम्ही करु असा इशारा सरन्यायाधींनी सरकारला दिला आहे.

सुप्रीम कोर्टाने असे म्हटले की, सांप्रदायिक वादाच्या क्षेत्रात महिलांना एखाद्या वस्तूप्रमाणे वापर करणे संविधानाचे उल्लंघन केल्यासारखे आहे. घटनेचा जो व्हिडिओ व्हायरल होत आहे तो अत्यंत लज्जास्पद आहे. सीजेआय चंद्रचूड, न्यायाशीध पीएम नरसिम्हा आणि न्यायाधीश मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने म्हटले, आम्ही सरकारला थोडा वेळ देत आहोत. जर काही कारवाई केली नाही तर आम्ही कारवाई करु.

सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकार आणि मणिपूर सरकारला निर्देश दिले आहेत की, या घटनेबद्दल जी कारवाई केली जाईल त्याचे संपूर्ण अपडेट्स कोर्टाला द्यावे. मीडियात जे काही या घटनेबद्दल दाखवले जात आहे आणि या हिंसेदरम्यान महिलांचा वापर संविधानिक स्वातंत्र्यांच्या भावनांच्या विरोधातील आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारने या बद्दल वेळोवेळी अपडेट द्यावेत. सरन्यायाधीशांनी या प्रकरणातील सुनावणी पुढील शुक्रवार पर्यंत टाळली आहे.

खरंतर मणिपूर सध्या दोन जातीमधील हिंसेमुळे चर्चेत आहे. मात्र आता व्हिडिओवरुन मणिपूरच्या डोंगराळ भागात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. रिपोर्ट्सनुसार, हा व्हिडिओ ४ मे रोजीचा आहे. या व्हिडिओतील दोन महिला कुकी समुदायातील आहेत. तर पुरुषांचा जो ग्रुप आहे तो मैतई समुदायातील आहे. आदिवासी संघटना इंडिजिनस ट्राइबल लीडर्स फोरमने आरोपींच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# अनैतीक मानवी व्यापार शिला आण्टीस अटक

लातूर : लातूर शहरातील होळकरनगर अंबाजोगाई रोड परिसरात भाड्याने राहणाऱ्या शिला आण्टी हिच्या विरोधात एमआयडीसी पोलिसांत अनैतीक वेश्या व्यवसाय करवून घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून तिला अटक करण्यात आली आहे.

अनैतीक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष पोलीस अधीक्षक कार्यालय लातूर यांच्या पथकाने लातूर शहरातील होळकरनगर भागात एका भाड्याच्या घरात बाहेरून मुलींना बोलावून घेणे तसेच त्यांना पैशाचे आमिष दाखवून पुरूषांना बोलावून घेवून स्वतःच्या स्वार्थासाठी पैसे घेवून वेश्या व्यवसाय करवून घेतल्या प्रकरणी धाड टाकण्यात आली. यात या विभागाच्या पोलीस पथकाने शिला रा. राजे शिवाजीनगर पाखरसांगवी, हा. मु. होळकरनगर लातूर हिच्या विरोधात भादंवि ३७०, ३४ व ३, ४, ५ अनैतीक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या पोलीस पथकांनी यावेळी या ऑण्टीच्या ताब्यातून परभणी व लातूर जिल्ह्यातील असलेल्या दोन पीडीत मुलींची सुटका केली. पोलीस अधिक तपास करत आहेत.


पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अप्पर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात व प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक अंकिता कणसे, पोलीस उपनिरीक्षक शामल देशमुख, सूर्यवंशी, जाधव, योगी, सुधामती वंगे, लता गिरी यांनी ही कारवाई केली.

# देशभरातील लोकांच्या स्मार्टफोनवर इमर्जन्सी अलर्ट; घाबरु नका असे आवाहन

मुंबई : देशभरातील लोकांच्या स्मार्टफोनवर सकाळी १०.२० वाजेच्या सुमारास एक इमर्जन्सी अलर्ट आला. तुमच्याही मोबाईलवर असा अलर्ट आला असेल, तर काळजी करण्याची गरज नाही. सध्या कोणताही धोका आलेला नसून, ही केवळ एक चाचणी होती. तेव्हा घाबरु नये असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

हा संदेश केंद्र सरकारच्या टेलिकम्युनिकेशन विभागाने हा अलर्ट जारी केला होता. याबाबतचे सविस्तर परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेले आहे. या माध्यमातून आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये, किंवा मोठ्या संकटावेळी देशातील सर्व नागरिकांना एकाच वेळी सूचना देण्याच्या यंत्रणेची चाचणी घेण्यात आली.

यामुळे भविष्यात अशी परिस्थिती निर्माण झाल्यास सर्व नागरिकांना वेळेत अलर्ट मिळणार आहे. देशभरातील लोकांच्या स्मार्टफोनवर सकाळी १०.२० वाजेच्या सुमारास एक इमर्जन्सी अलर्ट आला. तुमच्याही मोबाईलवर असा अलर्ट आला असेल, तर काळजी करण्याची गरज नाही. सध्या कोणताही धोका आलेला नसून, ही केवळ एक चाचणी होती. केंद्र सरकारच्या टेलिकम्युनिकेशन विभागाने हा अलर्ट जारी केला होता. या माध्यमातून आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये, किंवा मोठ्या संकटावेळी देशातील सर्व नागरिकांना एकाच वेळी सूचना देण्याच्या यंत्रणेची चाचणी घेण्यात आली. यामुळे भविष्यात अशी परिस्थिती निर्माण झाल्यास सर्व नागरिकांना वेळेत अलर्ट मिळणार आहे.



# केंद्र सरकार नफेखोरी करतेय; तुम्ही कबूल करायला का घाबरता?

## बाळासाहेब थोरात यांचा कृषिमंत्र्यांवर घणाघात

मुंबई : आंतरराष्ट्रीय बाजारात खतांच्या किंमती कमी झालेल्या असतानाही केंद्र सरकारकडून खतांच्या बाबतीमध्ये नफेखोरी सुरू आहे, शेतकऱ्याला मदत करायची सोडून हा कसला प्रकार सुरू आहे आणि कृषिमंत्री केंद्र सरकारची ही नफेखोरी कबूल करायला का तयार नाही? आपण कोणाला घाबरता? असा सवाल करून काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी कृषिमंत्री धनंजय मुंडे यांना चांगलेच कोंडीत पकडले.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज तिसरा दिवस होता. प्रश्नोत्तराच्या तासात बोगस बी बियाणे आणि खतांच्या वाढलेल्या किंमतीवरून काँग्रेस नेत्यांनी कृषीमंत्र्यांना अक्षरशः घेरले. काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी खतांच्या वाढलेल्या किंमतीवर बोट ठेवत धनंजय मुंडे यांच्याकडून उत्तराची अपेक्षा केली. त्यावर धनंजय मुंडे यांनी खतांच्या किंमती वाढलेल्या नसून त्या स्थिर आहे अशी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. त्यावर ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी त्यांच्या वाढलेल्या किमतीला केंद्र सरकार जबाबदार आहे हे कबूल करायला तुम्ही का घाबरता असा घनाघात केला.

थोरात यांनी, 'बियाण्यांचा काळाबाजार होत असल्यामुळे आणि बाजारामध्ये मोठ्या प्रमाणावर बोगस बियाणे आल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे, हा मुद्दा सलग तिसऱ्या दिवशीही सभागृहात उपस्थित केला. 'बोगस बियाण्यांवर कारवाईच्या नावाखाली ज्या सरकारी टोळ्या राज्यभर फिरत होत्या ज्याच्यामध्ये काही मंत्र्यांचे स्वीय सहाय्यक सहभागी होते, त्या बोगस डोळ्यांवर सरकारने नेमकी काय कारवाई केली त्याची सभागृहाला माहिती द्यावी, असाही आग्रह कृषी मंत्र्यांकडे धरला.

# जिल्ह्यातील उमेदवारांकरिता १ ते ३१ जुलै २०२३ दरम्यान कौशल्याची मागणी सर्व्हेक्षण मोहिमेचे आयोजन

उस्मानाबाद : कौशल्य, रोजगार उदयोजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी ही राज्यामध्ये कौशल्य विकास उपक्रमांची अंमलबजावणी व संनियत्रण करणारी नोडल एजन्सी म्हणून कार्यरत असून केंद्र व राज्य शासन पुरूस्कृत विविध कौशल्य विकास प्रशिक्षण योजना राबविण्यात येतात.

सदयस्थितीत कौशल्य विकास आराखडयाच्या माध्यमातून कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. प्रमोद महाजन कौशल्य व उदयोजकता विकास अभियान व किमान कौशल्य विकास कार्यक्रम यासह केंद्र व राज्य शासनाच्या महत्वकांक्षी योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी याकरिता राज्यातील युवक- युवतींना आवश्यक असलेले आणि त्यांनी मागणी केलेले कौशल्य प्रशिक्षण प्रदान केल्यास उमेदवारांच्या प्रशिक्षणा दरम्यान स्वारस्यामध्ये वृध्दी होउन प्रशिक्षण यशस्वी उमेदवारांना रोजगार स्वंयरोजगाराच्या अधिक प्रमाणात संधी उपलब्ध होतील. राज्यातील वय १८ ते ४५ वर्ष गटातील युवक-युवतींना मागणीवर आधारित (Demand Driven) कौशल्य प्रशिक्षण पुरविण्यासाठी कौशल्याची मागणी सर्व्हेक्षण मोहिमेचे दिनांक ०१ जुलै ते ३१ जुलै, २०२३ दरम्यान आयोजन करण्यात येत आहे. सदर मोहिमेंतर्गत सर्व्हेक्षणासाठी गुगल फॉर्म तयार करण्यात आला असून त्या गुगल फॉर्मची लिंक https://forms.gle/kYtSxbVhrZ2s7z6q8 अशी आहे.

त्याअनुषंगाने सर्व शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतन, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विविध शाखेतील विदयार्थी , शालेय/महाविदयालयीन शिक्षणातून गळती झालेले/ शिक्षण सोडलेले/ नोकरीच्या शोधात असलेले उमेदवार तथापि , समाजातील वंचित घटकातील उमेदवारांचा यात प्राधान्याने समावेश होण्यासाठी या उपक्रमांतर्गत कौशल्याची मागणी सर्व्हेक्षण गुगल फॉर्म भरण्यासाठी दिनांक ३१ जुलै २०२३ पर्यंत उपलब्ध असणार आहे. तरी जास्तीत जास्त गरजू उमेदवारांनी कौशल्याची मागणी सर्व्हेक्षण गुगल लिंकद्वारे फॉर्म भरावा असे आवाहन सहायक आयुक्त कौशल्य विकास,रोजगार व उदयोजकता उस्मानाबाद यांनी केले आहे.

# आधारकार्ड पडताळणीचा आग्रह न करता सरसकट संच मान्यता देणार का?

मुंबई : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी संच मान्यतेची प्रक्रिया सुरू केली असून त्यासाठी सर्व अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड पडताळणीची प्रक्रिया सुरू असून त्यात लाखो विद्यार्थ्यानाची आधारकार्ड वैध नसल्याचे आढळले आहेत का? आधारकार्ड पडताळणीचा आग्रह न करता सरसकट संच मान्यता देणार का? असा प्रश्न काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी उपस्थित केला.

पावसाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसर्या दिवशी काँग्रेसचे गटनेते आमदार सतेज पाटील व अन्य सदस्यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नानुसार विधान परिषदेत संच मान्यतेसंदर्भात चर्चा झाली. आधार पडताळणीमध्ये लाखो विद्यार्थ्यांची आधारकार्ड वैध ठरत नसल्याने संच मान्यता प्रलंबित असून शिक्षक भरतीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी चुकीच्या संच मान्यतेमुळे अनेक शिक्षक वेतनापासून वंचित आहेत. शिक्षण हक्क कायदा तरतुदिचा चुकीचा अर्थ लावून अतिरिक्त ठरलेल्या १७ हजार शिक्षकांच्या समायोजन पूर्ण झाले नसल्याबाबत आमदार पाटील यानी प्रश्न उपस्थित केले.

यावर उत्तर देताना शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी, आधारकार्ड पडताळणी करत असताना आलेल्या तांत्रिक अडचणीसंदर्भात उपाययोजना केल्या आहेत. शाळेच्या पटावर असलेले विद्यार्थी वैध करण्याची प्रक्रिया सुरु आहे. संच मान्यतेतील त्रुटी दूर करून सुधारित करण्याची कार्यवाही सुरु असून कृत्रिमरीत्या शिक्षक अतिरिक्त होण्याची शक्यता नसल्याचे सांगितले. ९१ टक्के विद्यार्थ्यांची पडताळणी करण्यात आली आहे. मात्र आधार पडताळणीच्या कारणाने विद्यार्थ्यांना प्रवेश किवा लाभापासून वंचित ठेवलेले नाही, असे केसरकर यांनी स्पष्ट केले.


# क्लाऊड कम्प्यूटिंग म्हणजे काय?

भाग-८

क्लाऊड कम्प्यूटिंग म्हणजे इंटरनेटद्वारे वेगवेगळ्या सेवांचे वितरण होय. या संसाधनांमध्ये डेटा स्टोरेज, सर्व्हर, डेटाबेस, नेटवर्किंग आणि सॉफ्टवेअर सारखी साधने आणि ऍप्लीकेशन्स समाविष्ट असतात. हार्ड ड्राइव्ह किंवा स्थानिक संचयन डिव्हाइसवर फायली ठेवण्याऐवजी, क्लाउड-आधारित स्टोरेज त्यास रिमोट डेटाबेसमध्ये जतन करणे शक्य करते.

सर्व्हिस (सास)(Software-as-a-service (SaaS))

सॉफ्टवेअर-ए-ए-सर्व्हिस (सास) मध्ये ग्राहकांना सॉफ्टवेअर ॲप्लीकेशनचा परवाना (license) दिला जातो. परवाने सामान्यत: आपण pay-as-you-go मॉडेलद्वारे किंवा मागणीनुसार दिले जातात. मायक्रोसॉफ्ट ऑफिसच्या ३६५.१ मध्ये सिस्टमचा हा एक प्रकार आहे.




व्यावसायिकांसाठी क्लाउड कंप्यूटिंग हा एक लोकप्रिय पर्याय आहे. ज्यामध्ये खर्च बचत, वाढीव उत्पादकता, वेग, कार्यक्षमता आणि सुरक्षितता यासह अनेक कारणांमूळे क्लाउड कंप्यूटिंगची मागणी वाढत आहे.

क्लाऊड कंप्यूटिंग म्हणजे काय?(What is cloud computing?)

क्लाऊड कंप्यूटिंग म्हणजे डेटा स्टोरेज, सर्व्हर, डेटाबेस, नेटवर्किंग आणि सॉफ्टवेअरसह इंटरनेटद्वारे विविध सेवांचे वितरण होय. क्लाउड-आधारित स्टोरेज फाइल्स रिमोट डेटाबेसमध्ये जतन करणे आणि मागणीनुसार त्या पुनर्प्राप्त करणे शक्य करते. यामध्ये सेवा सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही असू शकतात-खासगी सेवा विशिष्ट क्लायंटच्या असून त्या नेटवर्कवर होस्ट केल्या जातात. आणि सार्वजनिक सेवा शुल्कासाठी ऑनलाईन प्रदान केल्या जातात.

क्लाउड कम्प्यूटिंगचे प्रकार (Types of cloud computing)

क्लाऊड कम्प्यूटिंग हा मायक्रोचिप किंवा सेलफोन सारख्या तंत्रज्ञानाचा एक भाग नाही. त्याऐवजी, ही एक सिस्टिम आहे ज्यामध्ये मुख्यत: तीन सेवा आहेत :

१) सॉफ्टवेअर-एएस-ए-सर्व्हिस (SaaS),

२) पायाभूत सुविधा-से-ए-सर्व्हिस (Sa-aS)

३) प्लॅटफॉर्म-ए-अ-सर्व्हिस (PaS).

१) सॉफ्टवेअर-एएस-ए-




२) पायाभूत सुविधा-से-ए-सर्व्हिस (आयएएएस) (Infrastructure-as-a-service (IaaS))

इन्फ्रास्ट्रक्चर-ए-अ-सर्व्हिस (आयएएएस) मध्ये ऑन-डिमांड सेवेचा एक भाग म्हणून ऑपरेटिंग सिस्टमपासून सर्व्हरपर्यंत सर्व काही वितरीत करण्याची पद्धत आणि आयपी-आधारित कनेक्टिव्हिटीद्वारे स्टोरेजची एक पद्धत समाविष्ट असते. आयएएएस प्रणालीच्या लोकप्रिय उदाहरणांमध्ये आयबीएम क्लाऊड आणि मायक्रोसॉफ्ट अझर २.२ यांचा समावेश आहे.

३) प्लॅटफॉर्म-ए-अ-सर्व्हिस (पीएएस)(Platform-as-a-service (PaaS))

प्लॅटफॉर्म-ए-ए-सर्व्हिस (पीएएस) क्लाउड-आधारित कम्प्यूटिंग तीन स्तरांपैकी सर्वात जटिल मानली जाते. पीएएस सासमध्ये काही समानता सामायिक करतो, प्राथमिक फरक म्हणजे ऑनलाइन सॉफ्टवेअर वितरित करण्याऐवजी इंटरनेटद्वारे वितरित केले जाणारे सॉफ्टवेअर तयार करण्याचे एक व्यासपीठ आहे. या मॉडेलमध्ये सेल्सफोर्स डॉट कॉम आणि हीरोकू सारख्या प्लॅटफॉर्मचा समावेश आहे.

**क्लाऊड कंप्यूटिंगचा सेवा देणाऱ्या काही संस्था**

व्यावसायिक वेगवेगळ्या हेतूंसाठी क्लाऊड संगणकाची निवड करू शकतात. काही वापरकर्ते क्लाऊडवर सर्व ॲप्स आणि डेटा ठेवतात, तर काही लोक क्लाऊडवर खास ॲप्स आणि डेटा सर्व्हरवर ठेवून हायब्रिड मॉडेल वापरतात. कॉर्पोरेट कंप्यूटिंग क्षेत्रातील काही बडया कंपन्या क्लाऊड कंप्यूटिंगच्या सेवा देतात त्या पुढीलप्रमाणे :

गुगल क्लाऊड (Google Cloud)

मेझॉन वेब सर्व्हिसेस (AWS)

मायक्रोसॉफ्ट अझर (Microsoft Azure)

आयबीएम क्लाऊड (IBM Cloud)

अलिबाबा क्लाऊड (Alibaba Cloud)

ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस १००% सार्वजनिक आहेत. मायक्रोसॉफ्ट अझर ग्राहकांना त्यांच्या साइटवर काही डेटा ठेवण्याची परवानगी देतो. दरम्यान, अलिबाबा क्लाऊड ही अलिबाबा समूहाची सहाय्यक कंपनी आहे.

**क्लाउड कम्प्यूटिंगचे फायदे (Advantages)**

क्लाऊड कम्प्यूटिंगमध्ये एकापेक्षा अधिक डिव्हाइसवरील फायलींमध्ये प्रवेश करू शकतो. वापरकर्ते कोणत्याही संगणकावर त्यांचे ईमेल तपासू शकतात आणि ड्रॉपबॉक्स आणि गूगल ड्राइव्ह सारख्या सेवांचा वापर करून आपल्या फाइल्स संग्रहित करू शकतात.

क्लाउड कंप्यूटिंग सेवा वापरकर्त्यांना त्यांच्या music, फाइल्स आणि फोटोंचा बॅकअप घेणे देखील शक्य करतात. आणि हार्ड ड्राइव्ह क्रॅश झाल्यास त्या फायली त्वरित उपलब्ध असल्याचे सुनिश्चित करतात.

**क्लाउड कंप्यूटिंगचे तोटे (Disadvantages)**

क्लाऊड कंप्यूटिंगमध्ये वेग, कार्यक्षमता आदी जोखीम आहेत. विशेषत: संवेदनशील वैद्यकीय नोंदी आणि आर्थिक माहितीच्या बाबतीत नेहमीच ही एक मोठी चिंता असते. encryption पद्धत महत्वाची माहिती संरक्षित करते, परंतु त्याच्यात काही त्रुटी असल्यास डेटा अदृश्य होतो.

क्लाऊड कंप्यूटिंग कंपन्यांद्वारे देखभाल केलेले सर्व्हर नैसर्गिक आपत्ती, अंतर्गत बिघाड आणि वीज खंडित झाल्यामुळे डेटा loss ची परीस्थिती ओढवू शकते. कॅलिफोर्नियामधील ब्लॅकआऊटमुळे न्यूयॉर्कमधील वापरकर्त्यांना लकवा बसू शकेल आणि टेक्सासमधील एखाद्या कंपनीने जर त्याचा मेन-आधारित प्रदाता क्रॅश झाला तर त्याचा डेटा गमावू शकेल.




सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास इंटरनेट च्या माध्यमातून विविध प्रकारच्या संगणकीय सेवा वापरकर्त्याला प्रदान करणे म्हणजे क्लाऊड कॉम्पुटिंग होय.

क्लाऊड कम्प्युटिंगची बरीचशी उदाहरणे पाहायला मिळतात जसे की YouTube, Facebook, Google, Dropbox, Gmail, Picasa, Flickr इत्यादी

**क्लाऊड कम्प्यूटिंगची सुरुवात केव्हा झाली?**

आता ज्या लोकांनी सन १९९० ते २००० या कालावधी दरम्यान कोणत्याही संस्थे मध्ये काम केले असेल, त्यांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी संगणक आल्यानंतर झालेला बदल देखील नक्कीच आठवत असेल.

सन २००० च्या सुरुवातीला टेक्नॉलॉजी मध्ये बरेचशे बदल होऊ लागले व या बदलांमुळे संगणकाशी संबंधित उद्योगात देखील बरीचशी वाढ झाली. जशी की दूरसंचार कंपन्यांनी वर्चुअल प्रायव्हेट नेटवर्क (VPN) म्हणजेच खाजगी नेटवर्क पुरवायला सुरुवात केली, त्यामुळे कंपन्यांना आपल्या कार्यालयामध्ये स्वतःचे सर्वर ठेवण्याची गरज राहिली नाही. आणि हे सर्व क्लाऊड कम्प्यूटिंग मुळे शक्य झाले.

यामुळे फार मोठ्या प्रमाणामध्ये बदल घडवून आणणाऱ्या बराचशा गोष्टी त्या काळामध्ये कम्प्युटर सेक्टरमध्ये घडल्या होत्या. क्लाऊड कम्प्युटिंग म्हणजेच आपण संगणकावर करत असलेले काम हे आभासी पद्धतीने साठवून ठेवण्यासाठी एक प्लॅटफॉर्म किंवा व्यवस्था आहे.

क्लाऊड कम्प्युटिंग चे प्रकार (Type of Cloud Computing)

क्लाऊड कम्प्युटिंग चे मुख्यतः चार प्रकारांमध्ये विभाजन केले जाते ते पुढील प्रमाणे पाहूया.

१) खाजगी मेघ (Private Cloud):-

या प्रकारच्या क्लाऊड मध्ये एखादी कंपनी किंवा संस्था Private Cloud Services चा वापर करते. ज्या कंपनी ला किंवा संस्थेला मोठ्या प्रमाणात सुरक्षितता आणि लवचिकता हवी असते अश्या कंपन्या Private Cloud चा वापर करणे योग्य समजतात. तसेच या प्रकारचे प्रायव्हेट क्लाऊड च्या किमती जास्त असतात.

२) सार्वजनिक मेघ (Public Cloud)

हे क्लाऊड इंटरनेट चा साहाय्याने थर्ड पार्टी सर्व्हिस प्रदात्याकडून चालविले जातात, जसे कि फेसबुक, गुगल, ॲमेझॉन, मायक्रोसॉफ्ट इत्यादी.

तसेच या पब्लिक क्लाऊड मध्ये वापरकर्त्याला सर्व्हर, स्टोरेज, आणि विविध सॉफ्टवेअर अश्या प्रकारच्या सुविधा इंटरनेट च्या साहाय्याने प्रदान केल्या जातात. या प्रकारच्या क्लाऊड इंफ्रास्ट्रक्चर मध्ये युजर्सला कोणतेही कंट्रोल भेटू शकत नाही व त्याचबरोबर वेबसाइट इन्फ्रास्ट्रक्चर देखील त्यांना बघता येत नाही.

३) समुदाय मेघ (Community Cloud)


कम्युनिटी म्हणजेच समुदाय, हे क्लाऊड मल्टी टॅलेंट चा एक समुदाय आहे. या प्रकारच्या क्लाऊड चा अनेक कंपन्या किंवा संस्था याना ऍक्सेस दिलेला असतो आणि त्या सर्व प्रकारचा डेटा माहिती एकमेकांना शेअर करत असतात.



Mr. Deepak Salgar
NETWORK ENGINEER
SDO OFFICE AUSA
RENAPUR
9028365002

**४) हायब्रीड मेघ (हायब्रीड मेघ):-**

ज्यामध्ये दोन पेक्षा जास्त प्रकारच्या क्लाऊडचे एकत्रिकरण करून हायब्रीड क्लाऊड बनवले जातात. प्रायव्हेट, पब्लिक आणि कम्युनिटी या तिन्ही क्लाऊडला एकत्र करून हायब्रीड क्लाऊड इन्फ्रास्ट्रक्चर हे बनविले जाते. मात्र हे सर्व क्लाऊड कम्बाईन करून एक 'मल्टिपल डेव्हलपमेंट मॉडेल' तयार करण्याचे काम करत असतात ज्यामुळे आपल्याला बराचसा फायदा होतो.




# शासन आपल्या दारी महाराष्ट्र राज्य इतर महामंडळाच्या विविध कर्ज योजना

शासन आपल्या दारी या अभियानांतर्गत राज्यभरात नागरिकांना वेगवेगळया योजना आणि उपक्रमांच्या माध्यामातून लाभ देण्याचे काम राज्य शासनाकडून मोठया प्रमाणात केल्या जात आहेत. या विशेष लेखात आपण महाराष्ट्र राज्य इतर महामंडळामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध कर्ज योजनेबाबत जाणून घेणार आहोत.तर मित्रानो महाराष्ट्र राज्य इतर महामंडळामार्फत राबवल्या जाणाऱ्या कर्ज योजनांचे सन २०२३ -२४ या आर्थिक वर्षासाठी बीजभांडवल योजनेचे ४६, थेट कर्ज योजनेचे ग्रामीण भागासाठी ९० व शहरी भागासाठी २०, वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेचे १२२, गट कर्ज व्याज परतावा योजनेचे १३, शैक्षणीक कर्ज व्याज परतावा योजनेचे ११ व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजनेचे १४४४४ उद्दीष्ट प्राप्त झाले आहे.

वैयक्तिक कर्ज व्याज परतावा, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणीक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वंयसिध्दी व्याज परतावा योजनांसाठी महामंडळाच्या www.msobcfdc.org या वेबसाईटवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा तसेच थेट कर्ज योजना व बीजभांडवल कर्ज योजनेच्या अर्जासाठी जिल्हा कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

महामंडळाच्या योजना:- २०% बीजभांडवल योजना,सदर योजना राष्ट्रीयकृत बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून राबवण्यात येते.यात महामंडळाचे कर्ज २०%, बँकेचे कर्ज ७५%, व लाभार्थीचा सहभाग ५% असतो. कर्ज सहभागांची रक्कम बँकेने एकुण मंजुर केलेल्या कर्ज रकमेवर असते,कर्ज रक्कम मर्यादा रु.५ लक्ष,कर्ज फेडीची कालमर्यादा ५ वर्षे,व्याजदर महामंडळाच्या सहभाग रकमेवर ६% व बँकेच्या सहभाग रकमेवर प्रचलित बँक व्याज दरानुसार कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. १ लक्ष पर्यंत,अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे असावे

थेट कर्ज योजना,सदर योजना महामंडळामार्फत राबवण्यात येते.कर्ज मर्यादा रु. १ लक्ष,अर्जदाराचा सिबिल स्कोअर किमान ५०० इतका असावा,वय १८ ते ५५ वर्षे,परत फेडीचा कालावधी ४ वर्षे, नियीमत कर्ज परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारले जाणार नाही (हप्ता मासिक रु.२०८५) तथापि थकित कर्ज रकमेवर ४% व्याज आकारण्यात येते,कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.१ लक्ष पर्यंत असावी

वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना,सदर योजना राष्ट्रीयकृत बँका, खाजगी क्षेत्रातील बँका तसेच नागरी बँका मार्फत राबवीण्यात येते. कर्ज मर्यादा १० लक्ष असून महामंडळाच्या वेबपोर्टल,संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य आहे.कुटुंबाचे वार्षीक उत्पन्न मर्यादा ८ लक्ष रूपये पर्यंत,कर्ज परतफेडीचा कालावधी बँक निकषानुसार,कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याज परतावा रक्कम महामंडळ नियमानुसार लाभार्थीच्या आधार लिंक खात्यात दरमहा जमा करण्यात येईल,पात्र लाभार्थीस L.O.I (Letter of Intent) दिले जाईल त्या आधारे बँकेकडून कर्ज मंजुर करुन घ्यावे लागेल,

गट व्याज परतावा योजना,सदर योजना बँके मार्फत राबवीण्यात येते,महामंडळाच्या निकषानुसार विहीत केलेल्या वार्षीक उत्पन्न मर्यादेतील बचतगट भागीदारी/ सहकारी संस्था शासन प्रमाणीत,कर्ज मर्यादा रु.१० लक्ष ते ५० लक्ष,महामंडळाच्या वेबपोर्टल/ संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य,गटातील सर्व लाभार्थीचे खाते आधार लिंक असणे अनिवार्य,गटातील लाभार्थीचे वय १८ ते ४५ वर्षे, गटातील भागीदारांचे खाते किमान रु.५०० कोटींच्या वर ठेवी असलेल्या व कोअर बँकींग सिस्टीम,असलेल्या राष्ट्रीयकृत/ शेडयुल्ड बँकेत खाते असावे,गटातील सदस्यांनी यापूर्वी महामंडळाच्या वा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा लाभ घेतलेला नसावा,गटातील सर्व सदस्यांचा सिबील स्कोअर किमान ५०० असावा, कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे वा कर्ज कालावधी या पैकी जो कालावधी कमी असेल तो, कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याज परतावा रक्कम महामंडळ नियमानुसार लाभार्थीच्या आधार लिंक खात्यात दरमहा जमा करण्यात येईल,पात्र गटास ङ.ज.ख. दिले जाईल त्या आधारे बॅकेकडुन कर्ज मंजुर करुन घ्यावे लागेल,

शैक्षणीक कर्ज व्याज परतावा योजना,सदर योजना बँकेमार्फत राबवण्यात येते, बँक कर्ज रकमेवरील व्याज परतावा, देशांतर्गत व परदेशी उच्च शिक्षणासाठी रु.१० लक्ष व २०, महामंडळाच्या वेबपोर्टल/ संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य, विद्यार्थीचे वय १७ ते ३० वर्षे,लक्ष पर्यंत अनुक्रमे,अर्जदाराची कौटुंबीक वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.८ लक्ष,अर्जदार १२ वी ६०% गुणांसह उत्तीर्ण असावा, देशांतर्गत अभ्यासक्रम : १. आरोग्य विज्ञान, २. अभियांत्रीकी, ३. व्यावसायीक व व्यवस्थापन, ४. कृषी, अन्नप्रक्रीया व पशुविज्ञान,व्यवस्थापन बँकेने उपलब्ध करुन दिलेल्या कर्जामध्ये फक्त शैक्षणीक शुल्क, पुस्तके व साहीत्य खरेदीचा सामावेश राहील,परदेशी अभ्यासक्रम : १. आरोग्य विज्ञान, २. अभियांत्रीकी, ३. व्यावसायीक व परदेशी अभ्यासक्रमांसाठी Qs (Quacquarelli Symonds) रॅकींग/गुणवत्ता निकषांनुसार संस्थेचे स्थान २०० पेक्षा आतील,परदेशी अभ्यासक्रमाकरीता पात्र परिक्षा GRE (Graduate Record Exam.), TOEFL (Tset of English as Foreign Language) परिक्षा उत्तीर्ण.

कौशल्य विकास प्रशिक्षण योजना:राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील परंपरागत व्यवसायाचे आधुनिकीकरण झालेले असल्यामुळे त्या परंपरागत व्यवसायात कार्यरत असलेल्या तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या इतर मागासवर्गीय समाजातील पात्र व्यक्तींना आधुनिक प्रशिक्षणाचा लाभ व्हावा,तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करुन त्यांना कौशल्यपुर्ण बनविणे व त्याव्दारे रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे, वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे, शिक्षण १० वी उत्तीर्ण,महामंडळाच्या / MSSDS च्या वेबपोर्टलवर उमेदवाराने नांव नोंदणी करणे अनिवार्य आहे,इतर मागासवर्गीय प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, एकत्र कुटुंबाचे उत्पन्न प्रमाणपत्र (८ लक्ष पर्यंत), वयाचा दाखला, रहिवासी दाखला, आधार कार्ड अपलोड करावे लागेल,बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या सेवा, नोकऱ्यांची मागणी विचारात घेऊन प्रशिक्षण अभ्यासक्रम महामंडळामार्फत निवडण्यात येईल,महामंडळाने निवड केलेल्या अभ्यासक्रमातुन उमेदवारास त्याच्या कल चाचणीच्या आधारावर अभ्यासक्रमाची निवड करता येईल,स्किल इंडीया पोर्टलवर नोंदणी केलेल्या प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. संपुर्ण प्रशिक्षण महामंडळामार्फत देण्यात येईल, प्रशिक्षणादरम्यान दैनंदिन हजेरी अनिवार्य राहील.

महिला स्वयसिध्दी व्याज परतावा योजना:इतर मागास प्रवर्गातील महिलांचे सक्षमीकरण करुन त्यांना स्वावलंबी,व आत्मनिर्भर बनवणे,बचत गटातील महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंचे उत्पादन, प्रक्रीया, आधारीत मुल्य उद्योगांकरीता बॅकेमार्फत मंजूर केलेल्या रु.५ लक्ष ते १० लक्ष पर्यंतच्या कर्ज रकमेवरील १२% व्याजाच्या मर्यादेत व्याज परतावा महामंडळाकडुन उपलब्ध करुन देण्यात येईल. महामंडळाच्या वेबपोर्टल/संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य,महिला आर्थिक विकास महामंडळाच्या उचठउ मार्फत शिफारस केलेल्या महिला बचत गटात किमान ५०% इतर मागास प्रवर्गातील महिला असतील असा बचत गट व्याज परतावा योजनेसाठी पात्र राहील,पात्र महिला बचत गटातील इतर मागास प्रवर्गाच्या महिला अर्जदारांना सदर व्याज परतावा योजनेचा लाभ महामंडळाकडुन घेता येईल.

प्रथम टप्यात ५ लक्ष पर्यंत कर्ज बॅकेकडुन उपलब्ध करुन घेण्यास मान्यता देण्यात येईल,प्रथम टप्यातील कर्ज नियीमत फेडल्यानंतर व्दितीय टप्यात १० लक्ष पर्यंत कर्ज बँकेकडुन मंजुर करुन घेण्यास पात्र होईल, L.O.I. (पात्रता प्रमाणपत्र) व्दारे बँकेने मंजुर केलेल्या आणि नियमित कर्ज परतफेड केलेल्या बचत गटास १२% पर्यंतच्या व्याज मर्यादेत व्याज परतावा बँक प्रमाणीकरणानुसार मिळेल,

पात्रतेचे निकष: लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा इतर मागासवर्गीय रहीवासी असावा, तो महामंडळाचा, बँकेचा अथवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा, कुटुंबातील एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ घेता येईल,अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्याचे त्याला ज्ञान किंवा अनुभव असावा. कर्जाच्या अटी व शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे रहातील,योजनांच्या अधिक माहितीसाठी व अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांच्या तपशिलासाठी महराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, पहिला मजला, बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीजवळ, उस्मानाबाद क्रमांक ( ०२४७२ - २२३८६३ ) येथे कार्यालयीन बेळेत संपर्क साधावा,

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

